तरुण भारत संवाद

१६ एप्रिल २०२५

# ‘विवेकानंद’चा ‘एनआयआयटी’ सोबत करार

## रोजगारासह मनुष्यबळाला मिळणार चालना :तरुणांना कौशल्यनिर्मितीची संधी उपलब्ध

प्रतिनिधी

कोल्हापूर

कौशल्य विकास, संशोधन क्षेत्राला चालना आणि रोजगारक्षम मनुष्यबळ निर्मिती या उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेने नवी दिल्ली येथील एनआयआयटी फाउंडेशनबरोबर सामंजस्य करार केला आहे. आयबीएम स्किल्स–बिल्ड प्लॅटफॉर्मद्वारे तरुणांना कौशल्य–निर्मितीच्या संधी उपलब्ध करून देणे, कौशल्य विकासासाठी नवीन अभ्यासक्रमांच्या निर्मितीची निरंतर प्रक्रिया राबवणे ही सामंजस्य कराराची वैशिष्ट्ये आहेत.

स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेतर्फे सचिवा प्राचार्या शुभांगी गावडे आणि एनआयआयटी फाउंडेशनतर्फे दिपककुमार त्रिवेदी यांनी करारावर स्वाक्षऱ्या केल्या. कराराच्या माध्यमातून उद्योग क्षेत्रामध्ये आवश्यक असणारी विविध तांत्रिक कौशल्ये तसेच सायबर सिक्युरिटी, क्लाऊड कॉम्प्युटिंग, डेटा अॅनॅलिटिक्स, आर्टिफिशियल इंटेलिजन्स अशा विविध तंत्रज्ञानाचे प्रशिक्षण विद्यार्थ्यांना देण्यात येईल.




**कोल्हापूर : स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेने नवी दिल्ली येथील एनआयआयटी फाउंडेशनबरोबर सामंजस्य कराराचे पत्र एकमेकांना देताना संस्थेच्या सचिव शुभांगी गावडे व फाउंडेशनचे दिपककुमार त्रिवेदी.**

त्यामुळे विविध कौशल्यांनी युक्त युवक वर्गाची निर्मिती झाल्याने स्पर्धात्मक क्षमता उच्च दर्जाची होईल आणि बेरोजगारी कमी करण्यास सहाय्य होईल.

यावेळी विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर; रामकृष्ण परमहंस महाविद्यालय ,धाराशिव; पद्मभूषण डॉ. वसंतदादा पाटील महाविद्यालय, तासगाव; दत्ताजीराव कदम आर्ट्स सायन्स कॉमर्स कॉलेज ,इचलकरंजी; राजे रामराव महाविद्यालय, जत; डॉ. बापूजी साळुंखे इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी, मिरज; सावित्रीबाई फुले कॉलेज ऑफ नर्सिंग, कोल्हापूर; दत्ताजीराव कदम लॉ कॉलेज, इचलकरंजी ; डॉ. बापूजी साळुंखे इन्स्टिट्यूट ऑफ इंजीनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी कोल्हापूर यांनी महाविद्यालयीन स्तरावरील सामंजस्य करार केले. प्रास्ताविक संस्थेच्या व्यावसायिक शिक्षण समूहाचे संचालक प्रा. विरेन भिर्डी यांनी केले. त्रिवेदी यांनी कौशल्य विकास कार्यक्रमाचा आराखडा सादर केला.

प्राचार्या शुभांगी गावडे म्हणाल्या, कौशल्यपूर्ण युवकच आत्मविश्वासपूर्ण असतो. ज्ञान आणि कौशल्यनिर्मिती ही निरंतर प्रक्रिया असल्याने विद्यार्थी आणि शिक्षकांनी नेहमी जागरूक असावे. या कराराच्या माध्यमातून सक्षम युवक निर्माण होईल, असा विश्वास व्यक्त केला. संस्थेच्या अर्थ विभागाचे सहसचिव प्राचार्य डॉ. एम. एस. हूजरे यांनी शालेय जीवनापासूनच कौशल्य विकास महत्वाचा असल्याचे सांगितले.

संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे यांचे या करारासाठी मार्गदर्शन लाभले. प्राचार्य डॉ. जे. एस. देशमुख, प्राचार्य डॉ. सुहास सपाटे, प्राचार्य डॉ. एस. एस. मणेर, आर. के. भडके, डॉ. के. ए. कांबळे, डॉ. सी. एस. बागडी, आदी उपस्थित होते. प्रा. सुदर्शन महाडिक यांनी सूत्रसंचालन केले. समन्वयक प्रा. विराज जाधव यांनी नियोजन केले.